# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची बाजार समितीस भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयातील अर्थशास्त्र व कॉमर्स विभागातील ५० विद्यार्थ्यांनी शेतमालाची खरेदी-विक्री, व्यवहार, लिलाव पद्धती, बाजार समिती प्रणाली समजून घेण्यासाठी कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीस शैक्षणिक भेट दिली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भेटीअंतर्गत ई-नाम योजनेंतर्गत केंद्र शासनाने ई-ऑक्शन प्रणाली अंतर्गत कृषी विपणन, राष्ट्रीय बाजार योजना व समितीचे भावी प्रकल्प, गूळ बाजार याची माहिती घेतली. बाजार समितीचे उपसचिव वसंत पाटील व योगेश खाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संदीप पाटील यांनी केले.

प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले. भेटीचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र व कॉमर्स विभागाच्या वतीने प्रा. सनी काळे, डॉ. संदीप पाटील, प्रा. ए. बी. वसेकर, प्रा. ओंकार कुलकर्णी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांनी केले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'ग्राहक जागरुकता'

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयात ग्राहक जागरुकता उपक्रम उत्साहात झाला. विद्यार्थ्यांना ग्राहक संरक्षण कायदा व सायबर क्राईम याविषयी जागृत करण्यासाठी वाणिज्य विभाग व व्यक्तिमत्त्व विकास कक्ष यांनी आयोजन केले होते. सायबर क्राईम शाखेचे सागर माळवे, अ. भा. ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष सुहास गुरव यांनी मार्गदर्शन केले. ग्राहक पंचायतचे अध्यक्ष विनायक वाळवेकर यांनी जागृत ग्राहक प्रतिज्ञेचे वाचन करून घेतले. प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख प्रा. सनी काळे यांनी केले. आभार डॉ. यू. डी. दबडे यांनी मानले. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. ए. एल. मोहिते, डॉ. वाय. बी. माने, प्रा. एस. एन चव्हाण, प्रा. ओ. पी. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
शनिवार,
३ जानेवारी २०२६

# ‘खेलो इंडिया’साठी कृष्णा शेळके हिची निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

विवेकानंद कॉलेज कोल्हापूर बी.कॉम. भाग १ मधील विद्यार्थिनी कृष्णा शेळके हिची खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कृष्णा हिने शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय जलतरण स्पर्धेत ५० मीटर व १०० मीटर बटरफ्लाय खेळ प्रकारात प्रत्येकी २ सुवर्ण पदक, २०० मीटर बटरफ्लायमध्ये रौप्यपदक मिळवत शिवाजी विद्यापीठाच्या महिला जलतरण संघात स्थान निश्चित करत ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी जलतरण स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे. या कामगिरीनंतर तिची पाचव्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या जलतरण संघात ४ बाय १०० मीटर रिलेमध्ये निवड झाली. तिला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सचिव, प्राचार्य शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन मिळाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ.श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, एस. के धनवडे, श्री. सुरेश चरापले, तसेच आई व वडील यांचे मार्गदर्शन लाभले.



https: marketmedia.in





# विवेकानंद कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक व स्वागत इतिहास विभागप्रमुख डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी केले. याप्रसंगी प्रा. अनिल जांभळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. आभार डॉ. अवधूत टिपुगडे यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन इतिहास विभागातील प्राध्यापक, रजिस्ट्रार एस. के. धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी ज्युनिअर व सिनिअर कॉलेज प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# विवेकानंदच्या कृष्णा शेळके हिची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज येथे बी.कॉम. भाग १ मध्ये शिकत असलेली विद्यार्थीनी कृष्णा शेळके हिची खेलो इंडिया स्पर्धेसाठी निवड झाली आहे. कृष्णा शेळके हिने शिवाजी विद्यापीठ अंतर्गत झालेल्या आंतरविभागीय जलतरण स्पर्धेमध्ये ५० मीटर व १०० मीटर बटरफ्लाय खेळामध्ये प्रत्येकी २ गोल्ड पदक त्याच बरोबर २०० मीटर बटरफ्लायमध्ये सिल्वर पदक मिळवत शिवाजी विद्यापीठाच्या महिला जलतरण संघामध्ये स्थान निश्चित करत ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी जलतरण स्पर्धेकरिता पात्र ठरली. तसेच या कामगिरीवर तिची ५वी खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेममध्ये शिवाजी विद्यापीठाच्या जलतरण संघात ४+१०० मीटर रिलेमध्ये निवड झाली.



कृष्णा शेळके हिला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. साद मुजावर, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सुरेश चरापले तसेच आई व वडील यांचे मार्गदर्शन लाभले.


**PUBLIC NOTICE**

**NOTICE IS HEREBY GIVEN** that Mr. Anil Laxman Kharge is the lawful and bonafide present owner of Unit / Gala No. 11, Laxmi Industrial Complex, Vartak Nagar, Thane (West), which was acquired by him by virtue of Agreement for Sale on 22/12/2004 vide document no. TNN-2/8850/2004 from Mr. Jitendra Narayan Kashikar and Mrs. Vrushali Vivek Kashikar, partners of M/s. J. K. Engineering Works who originally purchased from M/s. Bhuvanendra Construction Company on 03.07.1992.

The Original first chain Agreement for Sale dated 03.07.1992 has been lost / misplaced in transit from his Residence at 01, Meghdoot, Sambhaji Path, Vishnu Nagar, Naupada, Thane-400 602 and/or in transit in the surrounding area on or about 29/12/2025 hence lodged complaint at the concerned local police station at Naupada, Thane vide lost **complaint no. NAU165/20251229T1636 dated 02/01/2026.**

पुढारी कोल्हापूर, बुधवार, ७ जानेवारी २०२६

# ऋषीकेश, शर्वरी कबनूरकर, अंशुमन शेवडे यांचे यश




ऋषीकेश कबनूरकर शर्वरी कबनूरकर

## बेळगाव येथील आंतरराष्ट्रीय फिडे बुद्धिबळ स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बेळगाव येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ७ गुण मिळवून पहिला क्रमांक घेत १३,००० रुपये आणि २३ फिडे गुणांची कमाई केली. शर्वरी कबनूरकर हिला ६.५ गुण मिळवून ३ रा क्रमांक मिळाला. तिला ५,००० रुपये पारितोषिक आणि २० फिडेल रेटिंग देऊन गौरव करण्यात आला. अशुमन शेवडेने ६ गुण मिळवून अंडर १६ गटातं ३,००० रुपयांचे पारितोषिक मिळवले आणि आपल्या फिडे १२० गुणांची कमाई केली.



अशुमन शेवडे

रोटरी चषक बुद्धिबळ स्पर्धा २०२६ आणि बेळगाव जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या सहकार्याने महावीर भवन येथे ही स्पर्धा झाली. स्पर्धेसाठी एकूण ५ लाख रुपयांची पारितोषिके होती. यात देशातील ३५६ खेळाडूंनी भाग घेतला. यात १८४ फिडे मानांकित खेळाडूंचा समावेश होता. ऋषीकेश, शर्वरी व अंशुमन हे अनुज ॲकॅडमी दाभोळकर कॉर्नर, ताराबाई पार्क येथे सराव करतात. ते स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी असून, त्यांना कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशनचे माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, ७ जानेवारी २०२६

# साठे, गवळी यांचे राज्यसेवा परीक्षेत यश

कोल्हापूर, ता. ६ : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेत मल्हारपेठ (ता. पन्हाळा) येथील गीतांजली गोपाळ साठे व वसगडेमधील (ता. करवीर) सीमा शांतिनाथ गवळी यांनी यश मिळविले. साठे यांनी राजपत्रित वर्ग-एकच्या पदाला गवसणी घातली असून, त्यांची उद्योग उपसंचालकपदी, तर गवळी यांची गटविकास अधिकारीपदी निवड झाली आहे.

साठे यांचे प्राथमिक शिक्षण तारळे (ता. पाटण, जि. सातारा) येथे, तर महाविद्यालयीन कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयातून झाले. कराडमधील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरची पदवी मिळविल्यानंतर विद्या प्रबोधिनी ॲकॅडमीत स्पर्धा


गीतांजली साठे


सीमा गवळी

परीक्षेचा अभ्यास सुरू केला. त्या पहिल्या प्रयत्नात मोटर वाहन निरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक, अन्न औषध प्रशासन, करनिर्धारण, प्रशासकीय अधिकारी गट अ नगरपरिषद परीक्षेतही त्यांनी यशाचा झेंडा रोवला. सध्या त्या ठाणे येथे विक्रीकर निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. त्यांचे पती राहुल आपटे मुंबई येथे पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असून, त्यांना वडील निवृत्त मुख्याध्यापक गोपाळ साठे, आई क्रांती साठे, सासू मुख्याध्यापिका पूजादेवी आपटे यांचे प्रोत्साहन लाभले.

गवळी यांचे माध्यमिक शिक्षण बापूसाहेब पाटील हायस्कूलमधून झाले. कमला महाविद्यालयातून त्या बारावी उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर त्यांनी शासकीय कृषी महाविद्यालयातून पदवी, तर राहुरीतील महात्मा फुले कृषी महाविद्यालयातून पदव्युतर पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. यापूर्वी त्यांची २०२१ ला झालेल्या राज्यसेवा परीक्षेतून सहायक गट विकास अधिकारीपदी निवड झाली. त्या सध्या तुळजापूर पंचायत समितीत सहायक गटविकास अधिकारी पदावर कार्यरत आहेत. त्यांना आई, वडील यांच्यासह पती उपजिल्हाधिकारी सागर नन्नवरे यांचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक :- ०९-०१-२०२६

तरुण भारत संवाद शुक्रवार, ९ जानेवारी २०२६

# 'विवेकानंद'मध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

प्रतिनिधी

कोल्हापूर

विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष आणि महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ व १० जानेवारी रोजी हिंदी गीत और गझल : विविध परिदृश्य या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली, संस्थेच्या सचिव

## ▪ महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ वे अधिवेशनही होणार

प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी, डॉ. वसंत मोरे, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर खराटे, डॉ. पांडुरंग पाटील, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

चर्चासत्राचे बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण हे हिंदी गीत और गझल या विषयावर मार्गदर्शन करतील. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात हिंदी गीत और गझल सामाजिक परिदृश्य् या विषयावर डॉ. पंढरीनाथ पाटील, डॉ. देवीदास बामणे, डॉ. नाजिम शेख मार्गदर्शन करणार आहेत. दुसऱ्या सत्रात हिंदी गीत और गजल : राजनीतीक एवं आर्थिक परिदृश्य् या विषयावर डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ सुरेश शेळके, डॉ विठ्ठलसिंह ढाकरे हे मार्गदर्शन करणार आहेत. तिसऱ्या सत्रामध्ये हिंदी गीत और गझल : नारी विषयक परिदृश्य् या विषयावर डॉ. विद्या शिंदे, डॉ. प्रतिभा येरेकर, डॉ. अरुण घोगरे, डॉ. शाहीन पटेल हे मार्गदर्शन करणार आहेत. चौथ्या सत्रात हिंदी गीत और गझल : धार्मिक एवं सांस्कृतिक परिदृश्य् या विषयावर डॉ. सातप्पा चव्हाण, डॉ. मिथिलेश अवस्थी, डॉ. हाशमबेग मिर्झा, डॉ. गोविंद बुरसे हे मार्गदर्शन करणार आहेत. तर पाचव्या सत्रात हिंदी गीत और गझल : अन्यान्य् परिदृश्य् या विषयावर डॉ. सुनिल बनसोडे, डॉ. सातापा सावंत, डॉ. दीपक पवार, डॉ. जालिंदर इंगळे हे मार्गदर्शन करणार आहेत.

पुढारी शुक्रवार, ९ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये आजपासून महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अधिवेशन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष व महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि.९ व १० जानेवारी रोजी 'हिंदी गीत और गजल विविध परिदृश्य' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते होणार आहे. संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

पुण्य नगरी

शुक्रवार, ९ जानेवारी २०२६ | कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेजमध्ये चर्चासत्राचे आयोजन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या ३२ व्या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे अधिवेशन दि. ९ व १० जानेवारी रोजी होईल. अधिवेशनामध्ये 'हिंदी गीत और गझल विविध परिदृश्य' या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, डॉ. इरेश स्वामी आदींच्या प्रमुख उपस्थितीत होत आहे.

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १० जानेवारी २०२६

# हिंदी गीत, गजलांमुळे सामाजिक ऐक्याची भावना दृढ

## माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी; 'विवेकानंद'मध्ये महाराष्ट्र हिंदी परिषद अधिवेशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

हिंदी गीत आणि गजल परंपरेमध्ये अनेक गजलकारांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. हिंदी गीत व गजल सामाजिक समस्यांचे चित्रण करते. त्याचबरोबर समाजातील भेदभाव, अन्याय, अत्याचाराचे चित्रणसुद्धा हिंदी गीत व गजलांमधून येते. दुष्यंतकुमार, डॉ. जहिर कुरेशी आदी गजलकारांनी खऱ्या अर्थानी गजल समाजापर्यंत पोहोचवून गजलेमध्ये सामाजिकता आणली. हिंदी गीत आणि गजलांनी सामाजिक ऐक्याची भावना समाजामध्ये दृढ केली आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी केले.




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ व्या अधिवेशन उद्घाटनप्रसंगी बोलताना माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी. समवेत प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे, डॉ. वसंत मोरे, डॉ. मधुकर खराटे आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

विवेकानंद कॉलेजमधील हिंदी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमीकक्ष व महाराष्ट्र हिंदी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'हिंदी गीत और गजल विविध परिदृश्य' विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र हिंदी परिषदेचे ३२ व्या अधिवेशन उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे होते. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. वसंत मोरे, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर खराटे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

चर्चासत्राचे बीजभाषक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण यांनी हिंदी गीत आणि गजल या विषयावर मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या पहिल्या सत्रात हिंदी गीत और गजल सामाजिक परिदृश्य या विषयावर डॉ. पंढरीनाथ पाटील, डॉ. देवीदास बामणे, डॉ. नाजिम शेख यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात हिंदी गीत और गजल : राजनीतिक एवं आर्थिक परिदृश्य या विषयावर डॉ. भाऊसाहेब नवले, डॉ. सुरेश शेळके, डॉ. विठ्ठलसिंह ढाकरे यांनी मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात रसिक श्रोत्यांसाठी 'जश्न ए महफिल' हा गजल गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी केले. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी स्वागत केले. प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. नीलेश जाधव यांनी सूत्रसंचालन केले. सहसमन्वयक डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

AYAAN HR Consultancy
• HR Payroll Management
• Salary Slip
• PF / ESIC
• Employee ITR
• PTRC
Contact - Mrs. Vrushali - 7972306375

www.positivewatch.in
POSITIVE WATCH
शासन मित्र | पोलीस मित्र

To Place Your
Tender / Notice / Obituary Ads.
नव शक्ति
THE FREE PRESS JOURNAL
Bank | Corporate Company | Industry | Others
Please mail us at : positivewatch.in@gmail.com
Shekhar Dhongade (Kop.) : 9420939699

## विवेकानंद कॉलेज

# प्राध्यापिका डॉ. माधवी शिवाजीराव जाधव यांना गौरविले सारस्वत सम्मानाने

**सर्वोत्कृष्ट शिक्षक मार्गदर्शक पुरस्कार (अनंत करंडक) व "स्वामिनी" राज्यस्तरीय पुरस्कार (अविष्कार फौंउडेशन) प्राप्त**

**रुपेश आठवले**

**कोल्हापूर** *कोल्हापूर : महाराष्ट्र हिंदी परिषदेच्यावतीने हिंदी भाषा, साहित्य व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील हिंदीच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. माधवी शिवाजीराव जाधव यांना सारस्वत सम्मानाने गौरविण्यात आले. परिषदेचे ३२वें अधिवेशन व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र शनिवारी विवेकानंद कॉलेजमध्ये सुरु झाले. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते डॉ. माधवी शिवाजीराव जाधव यांना पुरस्कार राशि, सम्मानपत्र, सम्मानचिह्न, शॉल, श्रीफळ देवून त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, मुख्य सचिव डॉ. गजानन चव्हाण, सोलापूर विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे, शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे, शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ.पंढरीनाथ पाटील, डॉ. देवीदास बामणे, डॉ. नाजिम शेख, डॉ.भाऊसाहेब नवले, डॉ सुरेश शेळके, डॉ विठ्ठलसिंह ढाकरे यांची प्रमुख उपस्थिती होती.*



**महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने डॉ. माधवी शिवाजीराव जाधव सारस्वत सम्मान से सम्मानित करते हुए पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी. सोबत अध्यक्ष डॉ. अनिल काळे, मुख्य सचिव डॉ. गजानन चव्हाण, सोलापूर विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे, शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे, शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी प्रमुख डॉ. पी. एस. पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी विभागप्रमुख डॉ. गजानन चव्हाण.**

## त्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका म्हणून ओळखल्या जातात

डॉ. जाधव यांना पदवी-पदवीत्तोर अध्यापनाचा ३६ वर्षांचा अनुभव असून त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या विभिन्न शैक्षणिक समित्यांवर काम केले आहे. राष्ट्रीय, अंतर्राष्ट्रीय पत्र-पत्रिकांमध्ये शोध निबंध प्रसिद्ध आहेत. राष्ट्रीय, अंतर्राष्ट्रीय चर्चासत्र, अधिवेशनात अध्यक्ष, विषय तज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन केले आहे. संत साहित्य, तुकडोजी महाराज यांच्या त्या गाढे अभ्यासक आहेत. कोल्हापूर, सांगली आकाशवाणी केंद्रावर त्यांची भाषणे प्रसारित आहेत. १०० हून अधिक व्याख्याने दिली आहेत. अंतर्राष्ट्रीय काव्य मंच, महिला काव्य मंच (महाराष्ट्र)मध्ये सक्रिय सहभाग आहे. पाठ्यपुस्तकांसाठी संपादक व लेखक भूमिका पार पाडली आहे. विविध विषयांवर त्यांच्या कविता प्रकाशित आहेत. यूजीसीचा मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केला आहे.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा

● मंगळवार, दि. १३ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय युवक दिन' उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन



कोल्हापूर : स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त व राष्ट्रीय युवक दिन उपक्रमांतर्गत विवेकानंद महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावरील आधारित ग्रंथप्रदर्शन झाले. याचे उदघाटन सागर वातकर व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते केले.

ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील ग्रंथ, नवीन प्रकाशित ग्रंथ ठेवले. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
• मंगळवार
दि. १३ जानेवारी २०२६

# तरुणांना आशावादी करणे काळाची गरज

## ताराराणी विद्यापीठाचे सागर वातकर यांचे मत : शिक्षकांनी सजग राहावे

जनप्रवास : कोल्हापूर

देशाला महासत्ता करण्यासाठी शिक्षण हा घटक महत्वाचा आहे. हे ओळखून स्वामी विवेकानंदांनी युवकांच्या शिक्षणावर भर दिला. तरुणांना आशावादी बनविणे ही आजच्या काळाची गरज असून शिक्षकांनी सजग समाज निर्मिती करावी, असे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे प्राध्यापक सागर वातकर यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त ते बोलत होते. स्वामी विवेकानंद आणि युवक हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते.

व्रातकर म्हणाले, आजचा तरुण हा दिशाहीन आहे. त्याला मार्ग दाखविण्याची आवश्यकता आहे. ज्ञान, भक्ती, वैराग्य आणि विवेक हे विवेकानंदांचे विचार अंगिकारणे गरजेचे आहे. तरुणांनी आपल्या सामर्थ्याची ओळख करुन घेऊन भारतीय संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे. भारत देश हा जगद्‌गुरु व्हायचा असेल तर ज्ञान, विज्ञान व सुसंस्काराने प्रेरित होणारी पिढी निर्माण व्हायला हवी.



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सागर वातकर. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, प्रा. अविनाश गायकवाड, डॉ. अस्मिता तपासे आदी.

अध्यक्षस्थानावरून डॉ. थोरात म्हणाले, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा प्रचार आणि प्रसार स्वामी विवेकानंदांच्या विचारांना अनुसरुन सुरु आहे. शिक्षकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवायला हवेत. आत्मानंद शोधण्याचे कसब शिक्षकात आहे. आजचा तरुण संभ्रमावस्थेमध्ये आहे. त्यांनी विवेकानंदांचे विचार अंगिकारुन स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करावा.

प्रास्ताविक प्रा. अविनाश गायकवाड यांनी केले. आभार डॉ. अस्मिता तपासे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी मानले. या कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी डॉ. श्रुती जोशी, डॉ. ई. बी. आळवेकर, डॉ. कविता तिवडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. प्रदीप पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले, प्रा. बी. एस. कोळी, कुलसचिव एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

13.1.26

सकाळ कोल्हापूर, बुधवार, १४ जानेवारी २०२६

# हरिष तोरसकर विद्यापीठ हॉकी संघात



हरिष तोरसकर

कोल्हापूर : भोपाळ येथील आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात हरिष तोरसकर याची निवड झाली. तो विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी व छावा मित्र मंडळचा खेळाडू आहे. त्याला विजय साळोखे, दि डिस्ट्रिक्ट हॉकी असोसिएशनचे सचिव सुदाम तोरसकर, क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६

# युवकांनी वाचनातून विवेकाचा विचार अंगीकारावा

**जनप्रवास : कोल्हापूर**

निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. त्याचबरोबर सद्याच्या काळात कृत्रिम बुध्दिमत्तेचे महत्व वाढते आहे. अशा काळात माणसाने मेंदूचा वापर करुन माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे. युवा पिढी मोबाईलच्या कहयात गेली आहे. या युवा पिढीने वाचनाकडे लक्ष देऊन विवेकाचा विचार अंगीकार करावा, असे आवाहन विनायक होगाडे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील इंग्रजी विभाग, वाङ्.मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संवाद लेखकाशी या उपक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.



• विनायक होगाडे यांचे आवाहन

संजय थोरात होते. डॉ. श्रुती जोशी यांची उपस्थिती होती.

होगाडे म्हणाले, तरुण लेखकांनी आपली मूळ संस्कृती विसरता कामा नये. इतरांचे अनुकरण न करता वेगळया वाटा धुंडाळायला हव्यात. लेखनासोबत लेखकाकडे जबाबदारी येत असते. सामाजिक अस्वस्थता लेखकाला लिहिण्यास प्रवृत्त करीत असते. डॉ. थोरात म्हणाले, साहित्याच्या माध्यमातून लेखक मानवी भावना व्यक्त करीत असतो. साहित्य आपल्याला नवनवीन विचार देत असते. साहित्यातून आपल्याला इतिहास, संस्कृती याची जाणीव होत असते. परंतु दुर्दैवाने आजच्या डिजिटल युगात साहित्य वाचन कमी होत आहे. पुस्तकांची जागा मोबाईल आणि टीव्हीने घेतली आहे.

प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी केले. सानिका पलंगे हिने ओळख करुन दिली. आभार पार्थ पोवार याने मानले. सूत्रसंचालन संजना पाटील हिने केले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. स्नेहल वरेकर, डॉ. प्रदीप पाटील, दीपक तुपे, डॉ. अवधूत टिपुगडे, डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी, डॉ.आरिफ महात, प्रा. सनी काळे उपस्थित होते.

# तरुणांना आशावादी बनविणे आजच्या काळाची गरज : सागर वातकर



कोल्हापूर : देशाला महासत्ता बनविण्यासाठी शिक्षण हा घटक महत्त्वाचा आहे. हे ओळखून स्वामी विवेकानंदांनी युवकांच्या शिक्षणावर भर दिला. विरक्ती असणारा तरुण विवेकानंदांना अभिप्रेत आहे. आजचा तरुण हा दिशाहीन आहे. त्याला मार्ग दाखविण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे प्राध्यापक सागर वातकर यांनी केले. ते विवेकानंद कॉलेजमध्ये स्वामी विवेकानंद जयंती सप्ताहनिमित्त आयोजित स्वामी विवेकानंद आणि युवक या विषयावर प्रमुख वक्ते बोलत होते.

प्राध्यापक सागर वातकर पुढे म्हणाले की, ज्ञान, भक्ती, वैराग्य आणि विवेक हे विवेकानंदांचे विचार अंगिकारणे गरजेचे आहे. तरुणांनी आपल्या सामर्थ्याची ओळख करून घेऊन भारतीय संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आवश्यक आहे. शरीर, मन यांना जोडणारे चारित्र्य निर्माण व्हावे हे स्वामी विवेकानंदांना अभिप्रेत होते. तरुणांना आशावादी बनविणे ही आजच्या काळाची गरज असून शिक्षकांनी सजग समाज निर्मिती करावी.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात हे होते. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ श्री कौस्तुभ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमांचे पूजन प्र.प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्रा. अविनाश गायकवाड यांनी करून दिली. आभार डॉ. अस्मिता तपासे यांनी

## 'राष्ट्रीय युवक दिन' उपक्रमांतर्गत

# विवेकानंद कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शन



कोल्हापूर : स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त तसेच राष्ट्रीय युवक दिन या उपक्रमांतर्गत विवेकानंद कॉलेजमधील ग्रंथालयाच्या वतीने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावरील आधारित ग्रंथप्रदर्शन संपन्न झाले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन प्रमुख वक्ते सागर वालकर व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले.

ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावरील ग्रंथ, नवीन प्रकाशित ग्रंथ ठेवण्यात आले होते. याप्रसंगी सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांनी, विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करण्याचा संदेश सागर वालकर यांनी दिला. या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिवा प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्रबंधक एस. के. धनवडे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. सीता पाटील यांनी स्वागत केले. सहाय्यक ग्रंथपाल जितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. ग्रंथालयातील सर्व सहकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

जाहीर नो

सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार, १५ जानेवारी २०२६

# डॉ. दीपक तुपे यांचा अनुवाद पुरस्काराने सन्मान


डॉ. दीपक तुपे

कोल्हापूर : महाराष्ट्र हिंदी परिषदेतर्फे विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांना डॉ. देविदास बामणे 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने गौरविले. विवेकानंद कॉलेज आणि महाराष्ट्र हिंदी परिषदेने घेतलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रात ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. रोख रक्कम, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. एस. वाय. होनगेकर लिखित 'आज गगन ठेंगणे' या मराठी आत्मकथेचा डॉ. तुपे यांनी 'आज आसमान बौना' या नावाने हिंदी अनुवाद केला आहे. या पुस्तकासाठी पुरस्कार मिळाला आहे. यावेळी डॉ. इरेश स्वामी, अनिल काळे, गजानन चव्हाण, चंद्रदेव कवडे, संजय थोरात, पांडुरंग पाटील, गजानन चव्हाण, माधवी जाधव, श्रुती जोशी, पंढरीनाथ पाटील, देविदास बामणे, नाजिम शेख, भाऊसाहेब नवले, सुरेश शेळके, विठ्ठलसिंह ढाकरे उपस्थित होते. डॉ. तुपे यांना पदवी-पदव्युत्तर अध्यापनाचा १५ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी यूजीसीच्या तीन बृहत शोधप्रकल्पावर परियोजना सहायक म्हणून काम केले आहे.

16.1.26

हॅलो प्रभात

# विवेकानंद कॉलेजमध्ये रक्तदानास उत्स्फूर्त प्रतिसाद



## प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये एन.सी.सी. व एन.एस.एस. विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीरात विद्यार्थ्यांसह शिक्षक, आजी-माजी विद्यार्थी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शिबीरात एकूण ८० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

या रक्तदान शिबीराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. थोरात म्हणाले, "रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून, रक्तदात्यामुळे एखाद्याला जीवनदान मिळते. त्याबरोबर समाजासाठी काहीतरी केल्याचे समाधानही मिळते. युवकांनी अशा उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा," असे आवाहन त्यांनी केले.

हे शिबीर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी मा. प्राचार्या सौ. शुभांगी गावडे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. यावेळी प्रा. डॉ. अश्विनी पाटील, प्रा. पी. वाय. राठोड यांच्यासह विवेकानंद इंजिनिअरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीही रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

शिबीरासाठी छत्रपती प्रमिला राजे सरकारी वैद्यकीय रुग्णालय (सीपीआर) ब्लड बँक यांचे सहकार्य लाभले. यावेळी ब्लड बँकेच्या डॉ. सुरभी खटोड व त्यांचे सहकारी उपस्थित होते. या उपक्रमाचे नियोजन एन.सी.सी. प्रमुख मेजर सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, डॉ. संदीप पाटील, डॉ. प्रविण बागडे व प्रा. हेमंत पाटील यांनी केले. शिबीरास ५ महाराष्ट्र व ६ महाराष्ट्र एन.सी.सी. ग्रुपच्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या परिसरातील गुरुदेव कार्यकर्ते, आजी-माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून उपक्रम यशस्वी केला.

तरुण भारत संवाद
मंगळवार, २० जानेवारी २०२६



कोल्हापूर : डॉ. दीपक तुपे यांचा पुरस्कार देऊन गौरव करताना शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. वसंत मोरे. बाजूस डॉ. इरेश स्वामी,

# 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने डॉ. दीपक तुपे यांचा सन्मान

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे साहा. प्रा. डॉ. दीपक तुपे यांचा डॉ. देवीदास बामणे 'संघर्ष' अनुवाद पुरस्काराने सन्मान करण्यात आला. विवेकानंद कॉलेज व महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने आयोजित ३२ वे अधिवेशन व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. वसंत मोरे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, मुख्य सचिव डॉ. गजानन चव्हाण, विवेकानंद कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात, डॉ. गजानन चव्हाण, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. देवीदास बामणे उपस्थित होते.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २१ जानेवारी २०२६

# पाडळी बुद्रुक येथे 'विवेकानंद'च्या श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर पाडळी बुद्रुक (ता. करवीर) येथे सुरू झाले. शिबिर २३ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

शिबिराचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगुले यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांना समाजाच्या समस्या व गरजा समजावून घेण्यास मदत होते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण, संभाषण कौशल्य, स्वावलंबन इत्यादी गुण विकसित होतात, असे मत त्यांनी उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

शिबिरात ग्रामसफाई, आरोग्य शिबीर, वृक्षसंवर्धन, एडस् जनजागृती, जलसाक्षरता, महिला सबलीकरण, पर्यावरण जागृती, सांडपाणी व्यवस्थापन, प्रदूषण व पर्यावरण जनजागृती आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सरपंच शिवाजी गायकवाड यांनी एन. एस. एस. विद्यार्थ्यांनी गावातील लोकांचे स्वच्छतेविषयी व मोबाईलच्या अतिवापराबद्दल प्रबोधन करावे, असे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक डॉ संदीप पाटील कार्यक्रमाधिकारी राष्ट्रीय सेवा योजना यांनी केले. यावेळी धनाजी पाटील उपसरपंच, संदीप पाटील, अरुणा पाटील आणि राजू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ राजश्री पाटील यांनी केले. हेमंत पाटील यांनी आभार मानले.

21.1.2026

तरुण भारत संवाद

बुधवार, २१ जानेवारी २०२६

# डॉ. महात यांना रचना पुरस्कार



कोल्हापूर : डॉ. आरिफ महात यांना सन्मानित करताना उपस्थित मान्यवर.

कोल्हापूर : महाराष्ट्र हिंदी परिषदेच्यावतीने विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे प्रमुख व सहाय्यक प्राध्यापक डॉ. आरिफ महात यांना त्यांच्या दस्तक या कविता संग्रहास 'प्रो.डॉ. विद्या शिंदे मौलिक रचना पुरस्कारा"ने गौरविण्यात आले.

विवेकानंद कॉलेज आणि महाराष्ट्र हिंदी परिषदेच्या वतीने आयोजित ३२ वें अधिवेशन व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ इतिहासतज्ञ डॉ. वसंत मोरे व सोलापूर विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील हिंदी विभागातील माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. चंद्रदेव कवडे यांच्या हस्तेत्यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे माजी कुलगुरु डॉ. इरेश स्वामी, महाराष्ट्र हिंदी परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल काळे, डॉ. गजानन चव्हाण, विवेकानंदचे प्रभारी प्राचार्य डॉ. थोरात, डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

यापूर्वी त्यांना महात्मा गांधी शिक्षा प्रतिभा सम्मान, साहित्य सम्मान, सर्वोत्कृष्ट मार्गदर्शक, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु सुवर्णपदक, डॉ.चंदुलाल दुबे पारितोषिक, महाकवि भूषण हिंदी अकादमी पुरस्कार, स्व. गुरूवर्य कल्लापा घाटे गुरूजी पारितोषिक, आर. व्ही. चिटणिस पारितोषिक असे पुरस्कार मिळाले आहेत.

पुण्यनगरी ▪ बुधवार, २१ जानेवारी २०२६

# श्रमसंस्कारातून सामाजिक बांधिलकीची जाणीव

## डॉ. टी. एम. चौगले; पाडळी बुद्रुक येथे विवेकानंद कॉलेजचे विशेष शिबिर



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्रमसंस्काराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, जबाबदारीची जाणीव आणि सेवाभाव निर्माण होतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयाच्या शिबिर उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हे शिबिर पाडळी बुद्रुक (ता. करवीर) येथे सुरू झाले असून, दि. २३ पर्यंत चालणार आहे.

या शिबिरात ग्रामस्वच्छता, आरोग्य शिबीर, वृक्षसंवर्धन, एड्स जनजागृती, जलसाक्षरता, महिला सबलीकरण, पर्यावरण जागृती, सांडपाणी व्यवस्थापन तसेच प्रदूषण व पर्यावरणाबाबत जनजागृती असे विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

पाडळीचे सरपंच शिवाजी गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, उपसरपंच धनाजी पाटील, संदीप पाटील, अरुणा पाटील व राजू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप पाटील यांनी केले. हेमंत पाटील यांनी आभार मानले.

सूत्रसंचालन डॉ. राजश्री पाटील यांनी केले. डॉ. पी. आर. बागडे, डॉ. बी. टी. दांगट, एम. के. पोवार, एल. आर. कुटिन्हो आदी उपस्थित होते.

दैनिक जनप्रवास • बुधवार, २८ जानेवारी २०२६

# युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे

**• स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मत**

**जनप्रवास : कोल्हापूर**

देशासाठी लढणाऱ्या शूरवीरांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वातंत्र्य समता, बंधूभाव, एकसंघ राष्ट्र व मानवतेचा संदेश देणाऱ्या घटनेने आपल्या देशाला सामाजिक सुरक्षितता, सहिष्णूता व स्थैर्य प्राप्त करुन दिले. युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील ध्वजारोहणप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे. सोबत शिक्षक.**

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेमधील ध्वजारोहण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग कॉलेज, डॉ. बापूजी साळुंखे हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिटयूट, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सेवानिवृत्त होणाऱ्या तसेच पीएच. डी. पदवी प्राप्त, सेट नेट परीक्षा उत्तीर्ण व पुस्तक लेखक, प्रकाशक, पेटंट प्राप्त प्राध्यापक यांचा सत्कार करण्यात आला.

पुढारी कोल्हापूर बुधवार, २८ जानेवारी २०२६

# फिडे बुद्धिबळ स्पर्धेत ऋषीकेश उपविजेता


ऋषिकेश कबनुरकर

कोल्हापूर : हुबळी (कर्नाटक) केएलई टेक्निकल कॉलेज येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय फिडे प्रजासत्ताक चषक रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषीकेश कबनूरकर याने ९ व्या फेरीत ८ गुण मिळवून दुसरा क्रमांक पटकाविला. त्याला ३० हजार रुपये आणि चषक देण्यात आला. १८ फिडे मानांकन गुण कमाई केली. ऋषीकेश हा अनुज अॅकॅडमी दाभोळकर कॉर्नर, ताराबाई पार्क येथे सराव करतो. तो स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. त्याला कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभागप्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सचिव कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

बुधवार, २८ जानेवारी २०२६ | कोल्हापूर

: प्राचार्य साळुंखे

**कोल्हापूर :** देशासाठी लढणाऱ्या शूरवीरांच्या व स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाने देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव, एकसंध राष्ट्र व मानवतेचा संदेश देणाऱ्या घटनेने आपल्या देशाला सामाजिक सुरक्षितता, सहिष्णुता व स्थैर्य प्राप्त करून दिले. आजच्या युवकांनी राष्ट्र ऐक्याच्या भावनेतून देशाला प्रगतीपथाकडे न्यावे, असे अवाहन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. ते प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विकास जाधव, कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, रजिस्ट्रार सचिन धनवडे यांनी केले. याप्रसंगी संस्था परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे इंजिनिअरिंग कॉलेज, डॉ. बापूजी साळुंखे हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, सावित्रीबाई फुले नर्सिंग कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी
■ गुरुवार, २९ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये उद्या युवा साहित्य संमेलन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाच्या माध्यमातून युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्यासाठी तसेच नवोदित लेखक, कवींना त्यांच्या सर्जनशीलतेसाठी मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

पुढारी गुरुवार, २९ जानेवारी २०२६

# 'विवेकानंद'मध्ये उद्या युवा साहित्य संमेलनाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालय वाङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या वतीने शुक्रवारी (दि. ३०) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे.

संमेलनाचे उद्घाटन डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, डॉ. श्रुती जोशी प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

पुण्यनगरी दि. ३०।०१।२०२६

# राष्ट्रीय युवा साहित्य संमेलन स्थगित

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वङ्मय मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षातर्फे शुक्रवार, दि. ३० रोजी पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते; मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे हे साहित्य संमेलन स्थगित करून पुढे ढकलण्यात आले, अशी माहिती प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, वाङ्मय मंडळप्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी दिली.

तरुण भारत संवाद शुक्रवार, ३० जानेवारी २०२६

# युवा साहित्य संमेलन लांबणीवर

कोल्हापूर : येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आज शुक्रवार दि. ३० रोजी आयाजित करण्यात आलेले पाचवे राष्ट्रीय आंतर महाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन पुढे ढकलण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर ३ दिवस शासकीय दुखवटा असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

कोल्हापूर येथील विवेकानंद कॉलेज मधील वाङ्‌मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने आज शुक्रवारी ३० रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत पाचव्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु हे संमेलन आता पुढे ढकलण्यात आले आहे, याची नोंद घ्यावी, असे आवाहन विवेकानंद महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, वाडमय मंडळ प्रमुख डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले आहे.

30-1-2026

तरुण भारत संवाद शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश उपविजेता

- गोव्याचा मंदार लाड विजेता
- हुबळीत प्रजासत्ताकदिनानिमित्त जलदगती स्वरुपात स्पर्धेचे आयोजन
- महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, पश्चिम बंगालच्या बुद्धिबळपटूंना ऋषिकेशने दिली टक्कर

प्रतिनिधी
कोल्हापूर

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रासह देशातील बुद्धिबळ खेळात आपल्या बुद्धिचातुर्याच्या जोरावर नाव कमवत असलेल्या कोल्हापूरच्या ऋषिकेब कबनूरकरने आंतरराष्ट्रीय फिडे प्रजासत्ताक चषक रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत उपविजेतेपद मिळवले. या उपविजेतेपदाला गवसणी घालताना त्याने स्पर्धेत ९ पैकी ८ गुणांची विश्वसनीय कमाई केली. हूबळी (कर्नाटक) येथील केलई टेक्निकल कॉलेजात ही स्पर्धा झाली.



ऋषिकेश कबनूरकर

दरम्यान, ऑल इंडिया चेस असोसिएशनच्या मान्यतेनी धारवाड चेस असोसिएशन व कर्नाटक चेस असोसिएशन यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय फिडे रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये देशातील लहानांपासून ते ५५ वर्षापर्यंतच्या अगदी तयारीच्या ३१६ बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा स्वीस लीग पद्धतीने आणि जलदगतीच्या आंतरराष्ट्रीय नियमांनुसार नऊ फेऱ्यांमध्ये झाली. या स्पर्धेत कोल्हापूरतर्फे ऋषिकेश कबनूरकर हा सहभागी झाला. त्याने स्पर्धेतील सामन्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल येथील बुद्धिबळपटूंनी बौद्धिक झुंज देत पराभूत करताना ९ पैकी ८ गुण मिळवले. याच गुणांमुळे ऋषिकेशच्या गळ्यात स्पर्धेच्या उपविजेतेपदाची माळ पडली.

गोव्याच्या मंदार लाडनेही स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळी करत ९ पैकी ८.५ गुण प्राप्त करुन स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. बक्षीस वितरण समारंभात स्पर्धा विजेत्या मंदारला ४० हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात आले. तसेच उपविजेत्या ऋषिकेशलाही ३० हजार रुपये व चषक असे बक्षीस देऊन गौरवले. तसेच नियमानुसार ऋषिकेशला फिडे १८ गुणही देण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हूबळी जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे धारवाड चेस असोसिएशन व कर्नाटक चेस असोसिएशनला सहकार्य लाभले. ऋषिकेश कबनुरकर हा अनुज ॲकॅडमीचा बुद्धिबळपटू आहे. तो सध्या स्वामी विवेकानंद महाविद्यालयात शिकत असून त्याला संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुमार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव व कोल्हापूर जिल्हा बुद्धिबळ असोसिएशन माजी सेक्रेटरी कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी

शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये हुतात्म्यांना आदरांजली

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांप्रती आदर व्यक्त करण्यासाठी दोन मिनिटे मौन पाळून विवेकानंद कॉलेजमध्ये आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

6

पुढारी , शनिवार, ३१ जानेवारी २०२६

# विवेकानंद महाविद्यालयामध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालय मराठी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा झाला. पंधरवड्यामध्ये व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन व अभिवाचन स्पर्धा तसेच शासकीय मुद्रणालय भेट असे उपक्रम राबविण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. 'बोलीचा जागर' या विषयावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी मार्गदर्शन केले. 'मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी' या विषयावर डॉ. प्रदीप पाटील यांनी विचार मांडले. शासकीय मुद्रणालयातील भेटीवेळी तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मुद्रणालयाच्या कामकाजाची व त्यातील रोजगाराच्या संधी याविषयी माहिती दिली. पंधरवड्याचे संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. रोहिणी रेळेकर यांनी केले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'हुतात्मा दिन' निमित्त भावपूर्ण आदरांजली




**कोल्हापूर प्रतिनिधी: पांडुरंग फिरींगे**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यासाठी दरवर्षी 30 जानेवारी रोजी संपूर्ण देशभर हुतात्मा दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून विवेकानंद कॉलेजमध्ये हुतात्मा दिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.शुक्रवार, दि. 30 जानेवारी 2026 रोजी सकाळी ठीक 11.00 वाजता कॉलेजच्या ग्रंथालयासमोरील प्रांगणात उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी परिसरात अत्यंत शिस्तबद्ध व भावनिक वातावरण निर्माण झाले होते.या कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येत हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून देशप्रेम, एकता व कर्तव्यनिष्ठेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प केला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची जाणीव जागृत होऊन राष्ट्रसेवेसाठी प्रेरणा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

# विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात संपन्न




**कोल्हापूर प्रतिनिधी: पांडुरंग फिरींगे**

येथील विवेकानंद कॉलेजमध्ये मराठी विभाग, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 14 जानेवारी ते 28 जानेवारी 2026 या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात संपन्न झाला.या पंधरवड्याच्या कालावधीत व्याख्याने, निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन, अभिवाचन स्पर्धा तसेच शासकीय मुद्रणालय भेट असे विविध भरगच्च व अभ्यासपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते झाले. "बोलीचा जागर" या विषयावर मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी सखोल मार्गदर्शन केले. तर "मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी" या विषयावर डॉ. प्रदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.शासकीय मुद्रणालयाच्या भेटीदरम्यान तेथील अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मुद्रणालयाच्या कार्यपद्धतीसह त्यातून उपलब्ध होणाऱ्या विविध रोजगार संधींची सविस्तर माहिती दिली. या पंधरवड्यात आयोजित करण्यात आलेल्या निबंध, वक्तृत्व, शुद्धलेखन व अभिवाचन स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.पंधरवड्याच्या समारोप प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले.या संपूर्ण उपक्रमाचे यशस्वी संयोजन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. डॉ. प्रदीप पाटील व प्रा. रोहिणी रेळेकर यांनी केले.मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषाभिमान, सर्जनशीलता व रोजगाराभिमुख दृष्टीकोन अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.